**<u>नियमित दिवाणी कब्जा क्र. ६७/२००८ मधील नि.क्र. २२१ वरील आदेश</u>**

( पारीत दिनांक – ०१/०१/२०२६)

सौ. शालाबाई दशरथ लोहार (मयत वारस) वगैरे २ वि. जानबा तुकाराम सुतार (मयत वारस) वगैरे

**०१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी वादी क्र. १–अ चे नाव कमी करणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीच्या कथनानुसार, वादी क्र. १–अ श्री. दशरथ विठ्ठल लोहार दि. २०/०३/२०२१ रोजी मलकापूर, ता. निपाणी, या ठिकाणी मयत झालेले असून वादी क्र. १–अ यांना सरळ व कायदेशीर वारस वादी क्र. १–ब ते १–ई हे आहेत. त्यांचेशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. वादी क्र. १–अ यांचे कायदेशीर वारस वादी क्र. १–ब ते १–ई हे वारस दाव्यामध्ये आहेत. त्यामुळे, त्यांना दावेत वादी म्हणून रेकॉर्डवर घेणेची आवश्यकता नाही. तरी, वादी क्र. १–अ चे नाव दावा अर्जी मधून कमी करणेस परवानगी मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

**०३.** सदरील अर्जावर प्रतिवादी यांना वारंवार पुरेशी संधी देवूनही प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने म्हणणे दाखल केले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणणेविना चालविण्यात येतो.

**०४.** वादी यांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.वारंवार पुरेशी संधी देवूनही प्रतिवादींतर्फे युक्तीवादासाठी कोणीही उपस्थित न झाल्याने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीच्या युक्तीवादाविना पुढे चालविण्यात येतो.

**०५.** प्रस्तुत प्रकरणी दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून हिस्सा तुटक होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये वादी क्र. १–अ यांचे नावे कमी करणेस परवानगी मागितली आहे. अर्जातील नमुद कारणांचा विचार करता तसेच दुरुस्तीच्या स्वरुपाचा विचार करता सदरची दुरुस्ती मंजूर करणे योग्य राहील असे वाटते. उपरोक्त नमुद कारणमिमांसेचा विचार करता, सदरची दुरुस्ती मंजूर करण्यात आल्याने दाव्याचे स्वरुप बदलेल असे निश्चितच वाटत नाही. सबब, सदरचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः–

**<u>– आ दे श –</u>**

१) अर्ज (निशाणी क्र.२२१) मंजूर करण्यात येतो.

२) वादीनी मंजूर अर्जाप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन घ्यावी.

PRANITA SUHAS PATIL Digitally signed by PRANITA SUHAS PATIL Date: 2026.01.01 17:31:06 +0000

कागल. (प्रणिता एस.पाटील)

दिनांक – ०१/०१/२०२६ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.